दैनिक मंगळवार दि. २२ जुलै २०२५
# महाराष्ट्र जीत
सपादकीय 2

## संपादकीय

# कोल्हापुरी चप्पल ‘चोरण्याची’ हिंमतच होऊ नये म्हणून...

गेल्या आठवड्यातील ‘प्राडा’ प्रकरण अजून तसं ताजंच आहे म्हणायचं. इटलीतील प्रसिद्ध फॅशन ब्रँड ‘प्राडा’ने त्यांच्या मेन्सवेअर फॅशन शोमध्ये एक चप्पल सादर केली, जी दिसायला अगदी हुबेहूब पारंपरिक कोल्हापुरी चप्पलसारखी होती. मात्र, त्यांनी ‘कोल्हापुरी’चा संदर्भ, क्रेडिट न देता किंवा उल्लेखही न करता, ती स्वतःच्या ब्रँडच्या नावाखाली बाजारात आणण्याचा प्रयत्न केला. या प्रकाराने सोशल मीडियापासून ते व्यापार मंडळांपर्यंत सर्वत्र संतापाची लाट उसळली. एकूण समाज, स्थानिक कारागीर आणि चेंबर ऑफ कॉमर्ससारख्या संस्थांनीही या कृतीचा तीव्र निषेध नोंदवला.

परिणामी, ‘प्राडा’ला आपली चूक मान्य करावी लागली आणि शेवटी कबूल करावं लागलं की हो, हे डिझाइन कोल्हापुरी चपलेवर आधारितच आहे. वरून त्यांनी ‘आम्ही स्थानिक कारागिरीचा सन्मान करतो’ अशी जोडही दिली. डागाळलेली प्रतिमा सुधारण्याच्या हेतूने ‘प्राडा’ने त्यांच्या टीमला थेट कोल्हापूरला पाठविलं. त्यांनी काही कारखाने आणि दुकानांना भेटी दिल्या, सात कोल्हापुरी चपला खरेदी केल्या. पण त्यांचं हे पाऊल खरंच सच्च्या संवेदनशीलतेतून होतं की केवळ जनतेच्या रोषाला शांत करण्यासाठी रचलेला ‘पीआर स्टंट’ होता; हा प्रश्नच आहे. कारण कोल्हापुरातील खरे कारागीर, हस्तकला मंडळं किंवा प्रत्यक्ष हस्तकलेशी संबंधित कोणत्याही संस्थेशी त्यांनी औपचारिक भागीदारी केली असल्याचं निदान वाचनात तरी आलेलं नाही.

या साऱ्या प्रकरणातून एक गोष्ट ठळकपणे समोर आली : जर आपण निर्धाराने आपल्या हक्कासाठी आवाज उठवला, तर जगातील सर्वांत मोठ्या ब्रँडनाही नमविता येतं. आपण गप्प बसलो असतो, तर कदाचित ‘प्राडा’ने हे प्रकरण सहज जिरवलं असतं. या प्रकरणातून मिळालेला आत्मविश्वास, लोकांना आपल्या कलेबद्दल आणि वारशाबद्दल अधिक जागरूक करेल, अशी आशा आहे. यापुढे या प्रतिक्रिया केवळ भावनिक असून, भागणार नाही, तर कायद्याची चौकट भक्कम करणं, आणि आपल्या कलाकृतींना सामूहिक बौद्धिक संपदा म्हणून बघण्याचा दृष्टिकोन विकसित करणंही तितकंच गरजेचं आहे. भारतीय ब्रँड तज्ज्ञ आता कोल्हापुरी चपलेला एक स्वतंत्र, मजबूत ब्रँड म्हणून गांभीर्याने घ्यायला लागले आहेत. कोल्हापुरीची लोकमान्यता व सजगता इतर प्रांतांतही पसरण्याची शक्यता आहे. ‘कोल्हापुरी’ने जागतिक बाजारपेठेत केवळ टिकून राहणं नव्हे, तर वाढणं आणि समृद्ध होणं हे आपलं ध्येय असायला हवं. यासाठी सर्व संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञांनी एकत्र येऊन एक धोरणात्मक दिशादर्शक कृती आराखडा तयार करणं आवश्यक आहे. ‘Vhaan’ सारखे अधिकाधिक ब्रँड या क्षेत्रात उतरले, तर कोल्हापुरी चपलांची वितरण साखळी अधिक भक्कम, कार्यक्षम आणि वाढती राहील. चांगल्या दर्जाच्या स्पर्धेमुळे खऱ्या कोल्हापुरीचा टॅग अधिक प्रतिष्ठेचा होईल. उत्तम गुणवत्ता राखून, स्वतःहून गुणवत्ता नियमन स्वीकारून, सर्वोत्तम दर्जाच ग्राहकांपर्यंत पोहोचविण्याचं भान ठेवलं गेलं, तर कोल्हापुरीची प्रतिमा अधिक ठळक होईल. हे साध्य करण्यासाठी पुढील गोष्टी अत्यावश्यक आहेतः

१. मजबूत सप्लाय चेन उभारणं २. GI टॅगचं काटेकोर पालन ३. गुणवत्ता नियंत्रणाचं स्वयंस्फूर्त धोरण ४. ब्रँडिंग, पॅकेजिंग, डिझाईन इनोव्हेशनमध्ये भक्कम गुंतवणूक ५. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे कारागिरांसाठी प्रशिक्षण, क्षमतावाढ आणि संधींची निर्मिती. हा उद्योग पूर्णतः हातकलेवर आधारित असल्याने कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे. त्यामुळे विशेष ट्रेनिंग सेंटर्स, क्लस्टर डेव्हलपमेंट प्रकल्प, एक्स्पोर्ट, फायनान्स, क्वालिटी कंट्रोल अशा क्षेत्रातील तज्ज्ञ समित्यांची निर्मिती गरजेची आहे. यासाठी राज्य व केंद्र सरकारकडून सक्रिय सहकार्य मिळवणं अत्यावश्यक आहे. कोल्हापुरी ही एक फक्त चप्पल नाही; तो पिढ्यानपिढ्या चालत आलेला कलेचा वारसा आहे. अनेकांच्या मनात जपलेली, आठवणीत रुजलेली ती एक कथा आहे, जी आज माझ्यासारख्या तरुणांनी जगाला त्यांच्या भाषेत सांगितली पाहिजे. जेव्हा आपण मनापासून ही गोष्ट जगाला सांगू, तेव्हा हे जग ती आवर्जून ऐकेल आणि कोल्हापुरीला तिच्या नावासकट, अभिमानाने स्वीकारेल. आणि मग ही आपली कोल्हापुरी ‘चोरून’ मिरवण्याची हिंमत कोणताही ब्रँड करणार नाही.

## कोमसापच्या मंथन कट्ट्यावर "स्वातंत्र्याचा गैरवापर" अनियतकालिकाचे प्रकाशन

महाराष्ट्र जीत

**भिवंडी (सुनील झळके)** ठाण्यातील कासारवडवली येथे शेडोबा मंदिर रोडवर निसर्गरम्य ठिकाणी चालणाऱ्या मंथन कट्ट्यावर कोकण मराठी साहित्य परिषद, ठाणे शाखेच्यावतीने समृद्ध मराठी अभियान अंतर्गत,"स्वातंत्र्याचा गैरवापर" या विषयावरील पाचव्या अनियतकालिकाचे प्रकाशन करण्यात आले.या अंकात १६ उत्तमोत्तम लेख आहेत. अंक डिजिटल स्वरूपात प्रकाशित करण्यात आले.

मंथन कट्टा येथे झालेल्या प्रकाशन समारंभात कोमसाप,ठाणे शाखेचे अध्यक्ष आणि अंकाचे संपादक मनोज वैद्य, अतिथी संपादक मनमोहन रोगे, शाखेच्या मार्गदर्शक भारती मेहता, कार्याध्यक्ष साधना ठाकूर, कार्यवाह मनीष वाघ, सह कार्यवाह पंकज पाडाळे, उपाध्यक्ष विनोद पितळे, पत्रकार रत्नपाल जाधव, मंथन कट्टाच्या समन्वयक संगीता जांभळीकर , विजय गडलिंग आणि इतर रसिक सदस्य उपस्थित होते. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते,त्यात सर्वांनी आपापली कला सादर केली. विशेष म्हणजे यावेळी उपस्थितांनी निसर्ग आणि पर्यावरणाच्याप्रती कर्तव्य समजून याप्रसंगी वृक्षारोपणही केले.




## २२ जुलैपासून भंडारा जिल्ह्यात 'देवाभाऊ सेवा सप्ताह' – १४ ठिकाणी भव्य रक्तदान शिबिरांची तयारी

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी / भंडारा.**

**भंडारा** - महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि जनतेच्या मनावर अधिराज्य गाजवणारे लोकनेते, देवेंद्र फडणवीस यांच्या २२ जुलै रोजी येणाऱ्या वाढदिवसानिमित्त भंडारा जिल्हा भारतीय जनता पक्षातर्फे 'देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताह' या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाची सुरुवात जिल्ह्यातील १४ ठिकाणी भव्य आणि ऐतिहासिक रक्तदान शिबिराने होणार आहे. या उपक्रमाची माहिती देताना भाजपा जिल्हाध्यक्ष आशू गोंडाणे यांनी सांगितले की, " देवेंद्र फडणवीस हे केवळ एक राजकारणी नसून, ते समाजसेवेचा एक आदर्श आहेत. त्यामुळे त्यांच्या वाढदिवसानिमित्त हार-तुरे किंवा बॅनरबाजीवर खर्च न करता, सामाजिक भावनेतून हा 'सेवा यज्ञ' आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे." सेवा सप्ताहांतर्गत २२ जुलैपासून पुढील नऊ दिवस विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये रक्तदान शिबिरासोबतच योग प्रात्यक्षिके, महाआरती, वृक्षारोपण, तसेच विविध आरोग्यवर्धक, शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांचा समावेश आहे. "रक्तदान हेच श्रेष्ठदान" या भावनेतून आयोजित या शिबिरातून अनेक गरजू रुग्णांना नवजीवन मिळेल आणि हीच फडणवीस यांना वाढदिवसाची खरी भेट ठरेल, असेही गोंडाणे म्हणाले. या ऐतिहासिक रक्तदान शिबिरात आणि सेवा सप्ताहात भाजपाचे सर्व पदाधिकारी, युवा मोर्चा, महिला मोर्चा, किसान मोर्चा, अनुसूचित जाती-जमाती मोर्चा, अल्पसंख्याक मोर्चा यांच्यासह विविध आघाड्यांचे कार्यकर्ते आणि अनेक सामाजिक संघटना मोठ्या उत्साहाने सहभागी होणार आहेत. आशु गोंडाणे यांनी जिल्ह्यातील सर्व नागरिकांना या सेवा यज्ञात सहभागी होऊन रक्तदान शिबिरात जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.



# प्रत्येक विद्यार्थ्यांनी एक तरी झाड लावावे - संजय चौधरी

महाराष्ट्र जीत

**पुणे** - श्रीसाई प्रतिष्ठाण वडगांवशेरी पुणे या संस्थेच्या वतीने पुणे जिल्हयातील पुरंदर तालुक्यातील परिंचे येथील कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक विद्यालय व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, परिंचे येथे वृक्षारोपण करण्यात आले. त्या प्रसंगी प्रत्येक विद्यार्थ्यांनी एक तरी झाड लावावे असे आवाहन संजयभाऊ चौधरी यांनी विद्यार्थीना केले. व शाळेतील होतकरु विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी श्रीसाई प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष संजयभाऊ चौधरी, कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक विद्यालय परिंचे या



महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. गोरेगावकर एम एम, कोलते बी.व्ही, भोसले व्ही एन, श्री वळकुंदे पी. एन. तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा गुरव मॅडम, सेवानिवृत्त पोलीस संस्थेचे, विनायकराव पवार, तानाजीराव कांबळे, संजयजी सोनवणे, नागेशराव भोसले, सुभाषराव तागड, संजय थोरात, प्रदीप क्षीरसागर, शिक्षक उपस्थित होते. श्रीसाई प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी एक एक वही मोलाची व एक विद्यार्थी एक झाड हा उपक्रम राबविण्यात येत आसतो. यावर्षी 24 वा उपक्रमासाठी मा. श्री. महादेवराव पवार, ॲड. सखाहरी शेळके ज्ञानेश्वर मेंगे, उत्तमराव कालेबाग, शरद बोंगाळे, सुरेश शेळके, शरदराव पवार, साहेबराव नवले, वेंकटसाई चलसानी व इतर यांनी विशेष मदत केली. या कार्यक्रमा प्रसंगी संजय चौधरी, तानाजीराव कांबळे, संजयजी सोनवणे व सुभाष तगडा, प्रदीप क्षीरसागर यांनी विद्यार्थीना मार्ग दर्शन केले. या प्रसंगी शाळेतील शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस. बी. कदम व रुपाली जगदाळे यांनी केले व एन. यू. दुधाळ यांनी आभार मानले या कार्यक्रमांचे आयोजन श्रीसाई प्रतिष्ठाण, पुणे या संस्थेचे अध्यक्ष संजय चौधरी यांनी केले होते.

# देगलूर,करडखेल, हनेगाव, मुक्रामाबाद,रस्ता दुरुस्तीसाठी जन आक्रोश रस्ता रोको आंदोलन

### रस्ता दुरुस्त करा आमचा जीव वाचावा.

महाराष्ट्र जीत

**देगलूर प्रतिनिधी/संघपाल मदने**

देगलूर तालुक्यातील बल्लूरफाटा , माळेगांव, बेम्बरा,ते मानुर, देगलूर ते हणेगाव, सुभाषनगर लोणी,मरखेल, करडखेड ते आमदापुर, मुक्रामाबाद आदी ६५ गावे व २० वाडीतांडेला आदी गावांसह बीदर ते नांदेड प्रवास करणाऱ्या शीख बांधवांचा मुख्य रस्ता अतिशय खराब झाला असल्याने वाहन धारकांना या रस्त्यावरुन मार्ग काढणे तारेवरची कसरत करावी लागत आहे त्यामुळे सदरील खड्डेमय रस्ते त्वरित करण्यात यावे म्हणून आज दिनांक २१ जुलै रोजी करडखेड चौरस्त्यावर रास्तारोको आंदोलन करण्यात आले यावेळी उपस्थितीत राहुन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने पाठिंबा जाहीर करुन मनोगत व्यक्त केले यावेळी संभाजी ब्रिगेड चे मराठवाडा अध्यक्ष संकेत पाटील सोमुरकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शरद पवार पक्षाचे नेते लक्ष्मीकांत पद्मवार,शिवसेना तालुकाप्रमुख बालाजी पाटील इंगळे खुतमापुरकर, शिवसेनेचे जिल्हा समन्वयक नागनाथ वाडेकर, शिवसेना देगलूर शहर प्रमुख संजय जोशी , कॉंग्रेसचे जिल्हा प्रवक्ते कैलास येसगे, राष्ट्रवादी काँग्रेस, सामाजिक कार्यकर्ते मच्छिंद्र गवारे मरखेलकर, मा.पंचायत समिती सदय रमेश सोनकांबळे शिवणीकर, विवेक पडकंठवार हणेगावकर, शिवसेना उपतालुकाप्रमुख मानाजी पाटील लोणे लोणीकर, युवा सेना शहर समन्वयक संतोष कांबळे,नागनाथ वाडेकर संभाजी ब्रिगेडचे तालुका प्रमुख , राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष राहुल देशाई,, कॉंग्रेसचे भरत पाटील, फुलारी,माधव वाडेकर, प्रा.मिरज पाटील आमदापुरकर, आदीसह सर्व पक्षीय पदाधिकारी उपस्थितीत होते



## मेंडकी येथे कायदे विषयक जनजागृती मार्गदर्शन शिबिर संपन्न

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत :- सुभाष खडसे**
**तालुका प्रतिनिधी**

माहूर तालुक्यातील ग्रामपंचायत मेंडकी येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून व तालुका विधी सेवा प्राधिकरण माहूरचे वतीने कायदेविषयक जनजागृती मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष गावचे सरपंच अशाबाई हातमोडे होते तर प्रमुख उपस्थितीमध्ये माहूर पंचायत समितीचे विस्ताराधिकारी प्रदीप मुरादे, माहूर न्यायालयाचे गोवंदे, विधी तज्ञ एडवोकेट दिनेश येवूतकर,एडवोकेट एस पी कांबळे नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे एडवोकेट प्रदीप चव्हाण, बीट जमादार गेडाम, पत्रकार पंडित धुप्पे, ग्रामसेवक जाधव, मुख्याध्यापक लासुरे, शिक्षक मुनेश्वर, सामाजिक कार्यकर्ता सोनू तोडसाम यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी कायदेविषयक मार्गदर्शन एडवोकेट दिनेश येवूतकर, एडवोकेट प्रदीप चव्हाण, विस्ताराधिकारी प्रदीप मुरादे, पत्रकार पंडित धुप्पे, यांनी केले यावेळी गावातील धनलाल पवार, आश्रोबा चव्हाण, मोहन चव्हाण, बळवंत पवार, कुंदन पवार,प्रेम पवार, गायकवाड,मोरे,आनंद चव्हाण, मुरली पवार,वसंत चव्हाण, गौतम येरेकर,अशोक पवार, शिवदास चव्हाण, अनिल राठोड, प्रितीबाई राठोड यांच्यासह विद्यार्थी व गुरुजन वर्ग आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रस्ताविक आभार व सूत्रसंचालन एडवोकेट प्रदीप चव्हाण यांनी केले.




## सांस्कृतिक कार्य विभागातर्फे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकरिता राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन

### 5 लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी / भंडारा.**

**भंडारा** :- पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा 2025 चे आयोजन करण्यात आले आहे.या स्पर्धेत नोंदणीकृत संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सहभागी होऊ शकतात. या स्पर्धेचा अर्ज पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबईच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या ऑनलाईन पोर्टलद्वारेच 20 जुलै पासून 20 ऑगस्ट 2025 पर्यंत स्वीकारण्यात येणार आहेत. अपूर्ण अर्ज रद्द ठरविण्यात येतील. ही स्पर्धा निःशुल्क असून सांस्कृतिक कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन, संस्कृतीचे जतन व संवर्धन याकरिता राबविण्यात आलेले उपक्रम, गडकिल्ले यांचे जतन व संवर्धन, राष्ट्रीय व राज्य स्मारके, धार्मिक स्थळे यांविषयी जनजागृकता तसेच जतन व संवर्धन, विविध सामाजिक उपक्रम व कार्ये, पर्यावरणपूरक मूर्ती, पर्यावरणपूरक सजावट,ध्वनिप्रदूषण रहित वातावरण, गणेशभक्तासाठी केलेल्या सोयी सुविधा यांच्या आधारे केलेल्या कार्याचा गौरव व्हावा आणि असेच समाजाभिमुख उपक्रम अधिकाधिक घडावेत म्हणून प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. याच निकषांच्या आधारे स्पर्धेचे परीक्षण केले जाईल. 27 ऑगस्ट पासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांनी 'गठीत केलेली जिल्हास्तरीय समिती या स्पर्धेत सहभागी मंडळे किंवा संस्थांच्या उत्सवस्थळाला भेट देतील आणि जिल्हास्तरीय परीक्षण पूर्ण करतील. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे आणि पुणे हे 4 जिल्हे प्रत्येकी 3 आणि हे 4 जिल्हे वगळता अन्य 32 अशा प्रत्येक जिल्ह्यातून एक यानुसार एकूण 44 शिफारसी राज्यस्तरीय परीक्षणासाठी स्वीकारल्या जातील. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी सर्वांनी आपापल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. राज्यस्तरीय परीक्षणात प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे 5 लाख, 2.5 लाख आणि 1 लाख 'रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. तसेच अन्य जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांना 25 हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. या स्पर्धेत अधिकाधिक संख्येने सहभाग नोंदवण्याचे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री अड. आशिष शेलार यांनी केले आहे.



# कारंजास्थीत बंजारा कॉलनीतील रामसभा सभागृहाचे लोकार्पन ना . संजय राठोड यांचे हस्ते संपन्न .

### आमदार सईताई डहाके; माजी नगराध्यक्ष दत्तराज डहाके विधान परिषदेचे आ बाबूसिंग महाराज यांची प्रमुख उपस्थीती .

महाराष्ट्र जीत

**नकूल उपाध्ये / कारंजा लाडः** कारंजा येथील बंजारा कॉलनीतील रामसभा सभागृहाचे लोकार्पन महाराष्ट्र राज्याचे मृदू व जलसंधारण मंत्री ना संजय राठोड यांचे हस्ते दि . २० जुलै राजी संध्याकाळी करण्यात आले . यावेळी कारंजा मानोरा विधान सभेच्या आमदार श्रीमती सईताई प्रकाशदादा डहाके ;माजी नगराध्यक्ष दत्तराज डहाडे; जीवन पाटील; जयकिसन राठोड; संत दासूजी महाराज ; राष्ट्रीय बंजारा समाज अध्यक्ष विलास राठोड; बंजारा कॉलनी अध्यक्ष शालीग्राम राठोड; पीपल्स रिपब्लीकन पार्टीचे अध्यक्ष विलास राऊत ; संत तारासिंग महाराज इत्यादी मान्यवरांची प्रमुख उपस्थीती होती . प्रमुख अतिथीचे उपस्थीतीत ना संजय राठोड यांचे हस्ते रामसभा सभागृहाचे लोकार्पन करण्यात आले . ना संजय राठोड यांचे सह उपस्थीतीतांचा सन्मान बंजारा कॉलनी अध्यक्ष शालीग्राम राठोड; पीपल्स रिपब्लीकन पार्टीचे विलास राऊत; बंजारा समाज राष्ट्रीय अध्यक्ष विलास राठोड; माजी प्राचार्य भाऊराव जाधव; विष्णू आडे;प्रशासनाचे वतीने तहसीलदार कुणाल झाल्टे यांनी केला . याप्रसंगी आयोजकांनी प्रास्ताविकातून सूचीत केलेल्या विकासात्मक कामा संदर्भात सकारात्मक प्रतीसाद मंत्रीमहोदय तथा आमदारांनी दिला . कार्यक्रमाला बंजारा समाज बांधवांची मोठ्या प्रमाणात उपस्थीती होती .






महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)